**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:08.03.2025** **वार:शनिवार**

---

1. राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल विधानसभेत सादर; चालू आर्थिक वर्षात आर्थिक विकास दर 7 पूर्णांक 3 दशांश टक्के राहण्याचा अंदाज
2. प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेच्या धर्तीवर राज्य सरकार नवी योजना आणणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा
3. जागतिक महिला दिनाचा राज्यभरात उत्साह; प्रत्येक ग्रामपंचायतीत आज विशेष ग्रामसभा आणि
4. साहित्य अकादमीचा भाषांतरासाठीचा पुरस्कार सुदर्शन आठवले यांना जाहीर

**आर्थिक पाहणी अहवाल**

चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर 7 पूर्णांक 3 दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. कृषी आणि निगडीत क्षेत्र 8 पूर्णांक 7 दशांश, सेवा क्षेत्र 7 पूर्णांक 8 दशांश आणि उद्योग क्षेत्र 4 पूर्णांक 9 दशांश टक्क्यांनी वाढण्याची शक्यता राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात वर्तवण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत काल हा अहवाल मांडला.

या आर्थिक वर्षात राज्याचं स्थूल उत्पन्न 45 लाख 31 हजार 518 कोटी रुपये राहण्याची शक्यता आहे, तर दरडोई उत्पन्न 2 लाख 78 हजार 681 रुपयांवरून 11 टक्क्यांनी वाढून 3 लाख 9 हजार 340 रुपये होण्याचा अंदाज आहे. स्थूल उत्पन्नाचा विचार करता महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असेल. मात्र दरडोई उत्पन्नामध्ये तेलंगण, कर्नाटक, तमिळनाडू यांच्यानंतर राज्याचा क्रमांक लागतो.

**मुख्यमंत्री**

प्रधानमंत्री मोफत सूर्यघर योजनेच्या धर्तीवर राज्य सरकार नवी योजना आणणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते विधानसभेत बोलत होते. ते म्हणाले....

**विकसित भारत याच्या अंतर्गत आपण एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आणि आपण असं ठरवलं की 2030 सालापर्यंत महाराष्ट्रामध्ये आपण जी काही ऊर्जा वापरतो त्यातली किमान 50 टक्के ऊर्जा ही अपारंपरिक ऊर्जा स्रोतातंन आली पाहिजे आज ती मागच्या वर्षीपर्यंत केवळ 13 टक्के होते. पुढच्या वर्षी 25 टक्के होईल. मला सांगताना आनंद वाटतो. हाती घेतलेले प्रकल्प किंवा सुरू झालेले प्रकल्प जे 2030 सालापर्यंत पूर्ण होणार आहे ते पूर्ण झाल्यानंतर 2030 साली. महाराष्ट्रामध्ये 52 टक्के वीज ही अपारंपरिक ऊर्जा स्रोतां या ठिकाणी निर्मित होईल.**

राज्यात ग्रामीण भागातले 14 हजार किलोमीटरचे रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे करण्यात येणार आहेत. तसेच एक हजार लोकसंख्या असलेल्या सुमारे 4 हजार गावांमध्ये सिमेंट कॉंक्रिटीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येईल, असंही त्यांनी यावेळी जाहीर केलं.

**एकनाथ शिंदे**

'राज्यातील सर्वसामान्य माणसाचं आयुष्य सुकर करण्याचं राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यामुळं विरोधकांनी जनतेच्या कामांमध्ये राजकारण न आणता विकासयात्रेत सहभागी व्हावं', असं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानपरिषदेत केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते.

**मागण्या मंजूरी**

विधान परिषदेत काल 2024-25 या आर्थिक वर्षाच्या 6 हजार 486 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आल्या. मात्र, खर्च आणि उत्पन्नाचा योग्य ताळमेळ नसल्यानं राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याची टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधानपरिषदेत पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेदरम्यान केली.

**गुंतवणूक**

गेल्या दहा वर्षांतली विक्रमी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात केवळ नऊ महिन्यात आली असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि देशांतर्गत व्यापार विभागानं डिसेंबर 2024 पर्यंतच्या परकीय गुंतवणुकीसंदर्भातल्या अहवालात ही माहिती दिली आहे. 2024-25 या आर्थिक वर्षातल्या पहिल्या 9 महिन्यात आतापर्यंत एकंदर 1 लाख 39 हजार 434 कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली आहे. ही गेल्या 10 वर्षात महाराष्ट्रात एका वर्षात आलेली सर्वाधिक परकीय गुंतवणूक आहे., असं फडणवीस यांनी समाजमाध्यमांवर म्हटलं आहे.

**विजया रहाटकर**

आज जागतिक महिला दिन आहे. या निमित्तानं राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रीय महिला आयोग ही महिलांच्या हक्कांसाठी जागृती निर्माण करणारी, देशातल्या महिलांसाठी कार्यरत असलेल्या तीन संस्थापैकी दुसरी मोठी संस्था आहे. जागतिक महिला आयोगामध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणारी ही अधिकृत संस्था असून 1925 मध्ये जागतिक महिला आयोगाच्या भारतातील प्रतिनिधी लेडी आबरदीन आणि मेहरबाई टाटा यांनी तिची स्थापना केली. आयोगाच्या सध्याच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी आजच्या जागतिक महिला दिनी आकाशवाणीच्या माध्यमातून महिलांना शुभेच्छा दिल्या....

**जागतिक महिला दिवसाच्या मी सगळ्या महिलांना खूप खूप शुभेच्छा देते, आणि हा दिवस आपणा सगळ्यांना सामर्थ्य देऊ अशा प्रकारची कामना आपण व्यक्त करते. गेल्या दहा वर्षामध्ये महिलांच्या करता सक्षमीकरणाच्या अनेक योजना बनत आहेत महिलांच्या सुरक्षेकरता सन्मान देण्याकरता अनेक कायदे पण झाले आहेत मला आपल्या सगळ्यांना या निमित्ताने सांगावस वाटत की अनेक संधी आपल्याकरता आहेत या संधी नीट शोधल्या पण पाहिजेत आणि, संधीचा आपण उपयोग**

**केला पाहिजे. राष्ट्रीय महिला आयोगाची अध्यक्ष म्हणून मी नेहमीच आपल्या सगळ्यांच्या सोबत आहे, आपण सर्वजणी मिळून आपल्या देशाला पुढे नेण्याकरता आपल्याकडे ज्या ज्या क्षमता आहेत, त्या क्षमतांचा उत्तमपणे उपयोग करून आपल्या क्षमता संवर्धन करून, देश पुढे नेण्याचा आपण सगळ्या मिळून उत्तम प्रयत्न करूयात आणि महिला सामर्थ्याचं एक उत्तम दर्शन पण घडवूयात.**

**विधिमंडळचर्चा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शस्त्रबलानं नव्हे तर प्रेमानं सर्वांना आपलंसं केलं, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. जागतिक महिला दिन आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्मशताब्दी वर्षानिमित्त विधानसभेत चर्चा झाली, त्यावेळी ते बोलत होते. विधानपरिषदेतही यानिमित्त 'महिलांच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि सक्षमीकरण' या विषयावर चर्चा झाली. 'आपला दृष्टिकोन प्रगल्भ होत नाही तोपर्यंत स्त्री पुरुष समानतेचं युग येणार नाही', असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.

विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केलं. अनेक यंत्रणा महिलास्नेही होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कोणतंही राजकारण न करता सरकारने महिलांना संरक्षण पुरवावं, असं विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.

**सावित्रीबाई पुरस्कार**

महिला-बालकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांसाठी राज्य सरकारनं ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार जाहीर केले. 2022-23 या वर्षांसाठी कोकण विभागातून नवी मुंबईच्या फुलन शिंदे, पुणे विभागातून जनाबाई उगले, नाशिकमधून अहिल्या नगरच्या डॉक्टर प्राजक्ता कुलकर्णी, छत्रपती संभाजीनगरच्या मिनाक्षी बिराजदार, अमरावतीच्या वनिता अंभोरे आणि नागपूरच्या शालिनी सक्सेना यांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**तटकरे ग्रामसभा**

आजच्या जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातल्या प्रत्येक ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. महिलांच्या हक्कांसाठी व्यापक लोकचळवळ उभी रहावी, महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रभावी धोरणं, गावपातळीवर अंमलात यावीत आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**गिर्यारोहण**

आपल्या कर्तृत्वानं महिलांनी सर्वच क्षेत्र पदाक्रांत केली आहेत. क्रीडाक्षेत्रात साहसी क्रीडा प्रकारातही महिला मागे नाहीत. अंध असूनही गिर्यारोहणाचं धाडस करणाऱ्या पुण्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिकत असणाऱ्या अंध विद्यार्थिनींनी गिरीप्रेमी संस्थेच्या सहकार्याने आज शिवनेरी सर करायचं ठरवलं आहे. ऐकूया याविषयीचा अधिक वृत्तांत...

**आज जागतिक महिला दिन आहे, आणि याच निमित्ताने आम्ही शिवाजी महाराजांचे जन्मस्थान शिवनेरीगड येथे ट्रेकिंगसाठी निघालो आहोत महत्त्वाचं म्हणजे आमचा ग्रुप हा अंध मुलींचा ग्रुप आहे**

**आम्ही स्वयंसेवक यांच्या सहाय्याने ट्रेकिंग करतो. ट्रेकिंगला गेल्यानंतर तिथल्या तोफ असतील तटबंदी असेल तर हे आम्ही हाताने बघतो, तसंच आमच्यासोबत जे स्वयंसेवक असतात ते आम्हाला आजूबाजूच्या गोष्टी सांगतात, असा आम्ही ट्रेकिंगचा अनुभव घेतो. पण यातून महत्त्वाची गोष्ट ही सांगायची आहे की, कोणतीही महिला असू दे मग ती अंध असेल अपंग असेल तर ती कोणतीही गोष्ट करू शकते मग ती ट्रेकिंग असेल तरी ही**

**पुरस्कार-अकादमी**

साहित्य अकादमीचा मराठी पुस्तकाच्या अनुवादासाठीचा वर्ष 2024 चा पुरस्कार सुदर्शन आठवले यांना जाहीर झाला आहे. गुरुचरण दास यांच्या 'द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड' या मूळ इंग्रजी पुस्तकाचं याच नावाने त्यांनी भाषांतर केलं आहे. मिलिंद म्हामल यांना 'भारतीय तत्वज्ञानाची रूपरेषा' या नावाने 'आऊटलाइन ऑफ इंडियन फिलॉसॉफी' या मूळ इंग्रजी पुस्तकाचं कोकणीत भाषांतर केल्याबद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. 50 हजार रुपये आणि ताम्रपट असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**निर्यात**

रत्नागिरीसह कोकणातली फळं आणि मत्स्योत्पादनं जगभरात निर्यात होतात. त्या दृष्टीने कोकण रेल्वेने रत्नागिरी रेल्वे स्थानकात स्वतंत्र मिनी कंटेनर रेक वाहतूक यंत्रणा तयार केली आहे. त्यामुळे आता निर्यातक्षम माल रत्नागिरीतून थेट जेएनपीटी बंदरात पाठवता येणार आहे. गद्रे मरीन एक्स्पोर्ट कंपनीचे वीस पूर्णतः वातानुकूलित मिनी कंटेनर रेक रवाना करून या यंत्रणेचा प्रारंभ करण्यात आला.

**हवामान**

कोकणात तुरळक ठिकाणी तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. उर्वरित राज्यात कल किमान तापमान सरासरीच्या जवळपास होतं.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.